


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २४० ●शनिवार,दि.२९ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# आजपर्यंत प्रत्येक सुखदु:खात काम करत आलोय; अविरतपणे पुढेही काम करत राहण्याचा शब्द

## धनंजय मुंडे यांना टार्गेट करून बहुजन समाजाचे नेतृत्व संपवण्याचा डाव परळीकरांनी हाणून पाडावा: प्रा सुनील मगरे

**परळी वै । प्रतिनिधी**

परळी शहरातील प्रत्येक गल्ली आणि प्रत्येक वस्त्यांची विकासाची ब्ल्यू प्रिंट आपल्याकडे असून त्या दृष्टिकोनातून सर्व ती पायाभूत कामे आपण केलेली आहेत. प्रत्येकाच्या सुखदुःखात सर्वात आधी धावून जाण्याचे काम आपण केलेले आहे. अडचणीच्या काळात सर्वात आधी आपले नाव लोकांना आठवते हा आशीर्वाद मिळालेला आहे. त्यामुळे विकासाची ही गंगा अधिक प्रभावी करण्याचा आपण प्रयत्न करणार असून आपण महायुतीच्या पाठीशी भक्कम उभे राहा असे आवाहन आ. धनंजय मुंडे यांनी शिवाजीनगर येथील कॉर्नर सभेत केले. तर यावेळी धनंजय मुंडे यांना टार्गेट करून बहुजन समाजाचे नेतृत्व संपवण्याचा डाव परळीकरांनी हाणून पाडावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुनील मगरे यांनी केले. नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व प्रभाग क्रमांक १० व प्रभाग क्रमांक १ साठी ही कॉर्नर सभा झाली.दहा चे उमेदवार डावरे सरोजा गौतम, प्रभाग क्रमांक दहा ब चे उमेदवार मुंडे महेश गोविंदराव व प्रभाग क्रमांक दहा च्या उमेदवार चाटे कुसुम आण्णासाहेब तर प्रभाग क्रमांक १ अ चे उमेदवार आघाव वंदना अश्विनकुमार, ▶ उर्वरित पान २ वर



## शहराच्या विकासाचा मास्टरप्लॅन आमच्याकडे तयार: आ.संदीप क्षीरसागर



### सभा व कॉर्नर बैठकांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

शहराच्या विकासाचा मास्टरप्लॅन आमच्याकडे तयार आहे, फक्त एकदा मतदानरूपी आशिर्वाद देऊन बीड शहराच्या विकासाचा अध्याय सुरू करण्याची संधी द्या. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी मतदारांना केले. नगराध्यक्षपदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे आणि प्रभाग क्रमांक ९,१०,११ नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ शुक्रवारी (दि.२८) सायंकाळी शहरातील राजीव गांधी चौकात जाहीर सभा घेतली यावेळी आ. क्षीरसागर बोलत होते. ▶ उर्वरित पान २ वर

## शहरात एकाही नगरसेवकाने अमर नाना एवढे विकास कामे वार्डात केले नाही



### अमर नाईकवाडे म्हणजे चालते फिरते मदत केंद्र

**प्रभाग ३ मध्ये २ तारखेला मतदारांची परीक्षा ; विकास कामांना प्राधान्य**

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग क्रमांक ३ सध्या चर्चेत असून त्याचे कारणही तसेच असून, येथे सर्वाधिक निधी आणणारे, एक फोनवर उपलब्ध होणारा कार्यकर्ता अमर नाईकवाडे यांचा हा प्रभाग आहे. त्यांचे काम आणि मदतीला धावून येण्याची सवय पाहता अमर नाईकवाडे म्हणजे या भागातील सर्वसामान्यांसाठी मोठा आधार असल्याने त्यांना चालते फिरते मदत केंद्र म्हणून संबोधले जाते. यामुळे येत्या २ डिसेंबरला अमर नाईकवाडे ▶ उर्वरित पान २ वर

## सोमवारी फडणवीस बीडमध्ये

**बीड । प्रतिनिधी**



नगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने जोरदार तयारी सुरू केली असून, या प्रचारातील महत्त्वाचा टप्पा म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बीडमध्ये १ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता विजय संकल्प सभा आयोजित करण्यात आली आहे. या विजय संकल्प सभेमुळे भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योतीताई रविंद्र घुमरे यांच्यासह नगरसेवकांच्या विजयावर शिक्कामोर्तब होणार आहे. या सभेला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, भाजपचे आमदार, पदाधिकारी, नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी निवडणुकीच्या ▶ उर्वरित पान २ वर

## कोणाच्याही दबावाला बळी न पडता विकासाच्या मुद्यावर मतांचे आशिर्वाद द्याः आ. विजयसिंह पंडित



### बीड शहरातील रामतिर्थ, आदर्शनगर येथील प्रचार सभेला उत्स्फुर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस व मित्र पक्षाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांनी प्रचार सभांचा धडाका उडवून दिला असून शहरातील रामतिर्थ, हनुमाननगर व आदर्शनगर येथे झालेल्या प्रचार सभेला रेकॉर्डब्रेक गर्दी झाली. आ. विजयसिंह पंडित, माजी नगरसेवक दिलीप गोरे यांच्यासह राष्ट्रवादी-शिवसेना- ▶ उर्वरित पान २ वर

## परळीच्या पद्मावती भागात धनंजय मुंडेंचा प्रचाराचा झंजावात



### पायी रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, घरोघर स्वागत

**परळी वै । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ शहरातील पद्मावती भागात महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आज धनंजय मुंडे यांच्या प्रचाराचा झंजावात पहायला मिळाला. धनंजय मुंडे यांनी पायी रॅली द्वारे प्रभाग क्रमांक ७ मधील नागरिकांच्या भेटी घेत महायुतीच्या उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन केले. राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना (शिंदे गट), रिपाइं (आठवले गट) व मित्र पक्ष महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी ▶ उर्वरित पान २ वर

## डॉ. गौरी पालवे-गर्जे आत्महत्या प्रकरणी, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी कुटुंबीयांची घेतली भेट; आरोपींवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश

### न्याय मिळाल्याशिवाय मागे हटणार नाही' : डॉ. गोऱ्हे ; सक्षम सरकारी वकील उपलब्ध करून देण्याचे आश्वासन



**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पिंपळनेर येथे आज विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्व. डॉ. गौरी पालवे-गर्जे यांच्या आई-वडिलांची भेट घेऊन त्यांच्या मनातील प्रश्न, वेदना आणि न्यायाबाबतच्या अपेक्षा जाणून घेतल्या. भेटीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, गौरी पालवे-गर्जे यांचा मुंबईतील मृत्यू अत्यंत दुर्दैवी आहे. तिच्या कुटुंबाने काही महत्त्वाची अतिरिक्त माहिती पोलिसांना द्यायची इच्छा व्यक्त केली; परंतु त्यांची नोंद झाली नव्हती. या तक्रारीची मी तत्काळ दखल घेऊन मुंबई पोलिसांशी तसेच स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांशी बोलले ▶ उर्वरित पान २ वर

### ●कुटुंबाला न्यायप्रक्रियेतील अडथळे दूर करण्यासाठी आर्थिक मदत

**गौरी पालवे-गर्जे यांचे आई-वडील न्यायासाठी लढत असताना त्यांच्यावर आर्थिक ताण येऊ नये, यासाठी डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुढाकार घेतला आहे. पुढील न्यायालयीन प्रक्रियेसाठी आवश्यक ती आर्थिक मदत वैयक्तिक पातळीवरून कुटुंबीयांना दिली आहे. न्याय मिळविण्यासाठी कोणतीही कमतरता राहू देणार नाही. कुटुंबाच्या पाठीशी मी वैयक्तिकरीत्या उभी आहे, असे त्या**




## उमेवाराना दिलासा प्रचाराची वेळ वाढवली

### मतदानाच्या आदल्या दिवशी रात्री पर्यंत प्रचाराच्या फायरी झडणार

**बीड । प्रतिनिधी**

नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीसाठी उमेदवारांना केवळ चार दिवसांची वेळ मिळाल्याने रात्र लहान आणि सोंग जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली. परंतु आता उमेदवार मतदानाच्या आदल्या दिवशी रात्री दहा वाजेपयरत प्रचार करु शकतात असा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला आहे. यामुळे उमेदवारांना दिलासा मिळाला असून, आता १ डिसेंबरच्या रात्री १० पयरत प्रचाराच्या फायरी झडणार आहेत. राज्यात नगरपरिषद व नगरपंचायतीच्या सार्वत्रिक पांच वार्षिक निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून, राज्यभर प्रचाराचा धुरळा आणि आरोप प्रत्यारोपांच्या फायरी झडत आहेत. या निवडणुकीसाठी दि. २६ रोजी उमेदवारांना ▶ उर्वरित पान २ वर

## 35 वर्ष काम केलेली यादी येत्या 3 तारखेला द्या

**बीड । प्रतिनिधी**



गेल्या ३५ वर्षात आपण विकास केंद्रस्थानी ठेवून राजकारण करत आहोत. राज्यासह देशात भाजपची सत्ता आहे. सर्वत्र विकासाचा बोलबाला आहे. त्यामुळे शहरवासीयांनी येत्या २ तारखेला गल्ली ते दिल्ली साखळी तयार करा, असे म्हणत भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. तसेच, '३५ वर्षात काय केले?' असा सवाल विचारणाऱ्यांना 'सवाल काय विचारता, यादीच देतो' असे म्हणत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी थेट आव्हान दिले आहे. भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार ▶ उर्वरित पान २ वर

### आण्णा, पंकजाताईंच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल-डॉ.योगेश क्षीरसागर

युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर म्हणाले की, विधानसभा निवडणुकीतील पराभवाने आम्ही खचून गेलो नाही, तर पुन्हा नव्याने उभे राहिलो. ज्या पक्षात गेलो, तेथे गटबाजीमुळे बाजूला सारण्याचा प्रयत्न झाला. तरीही आम्ही सामंजस्याची भूमिका घेतली. मात्र विरोधक हे विरोधकच असतात, हे लक्षात आल्यानंतर आम्ही थेट भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. पक्षाच्या नेत्या पंकजा मुंडे यांनी आमच्यावर या निवडणुकीची मोठी जबाबदारी सोपवली. हा निर्णय सर्वांनाच आवडला. आण्णांनाही तो नक्कीच आवडला असणार. कुठेही असलो तरी विकासासाठी सरकार म्हणून भाजपकडेच जावे लागले असते, असेही त्यांनी स्पष्ट केले. आता सर्वजण एकत्रितपणे ताकदीने काम करत आहोत. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. बीडच्या जनतेला आमची विकासकामे माहीत आहेत. पंकजा मुंडे आणि जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील वाटचाल करणार असून सर्व कार्यकर्त्यांनी मनभेद-मतभेद विसरून काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

### मुख्यमंत्र्यांच्या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

येत्या १ डिसेंबर रोजी होणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विजय संकल्प सभा होणार आहे. या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

# जग बदलण्यापेक्षा स्वयं बदला, जग बदलायला वेळ लागणार नाही...

आपण बरेचदा चांगला उद्देश ठेऊन कार्य करत असतो,परंतु काळ वेळ व परिस्थिती नुसार त्याचे परिणाम उमटत असतात.माझा एक मित्र आहे,विजय तो मजुरी करू ,नोकर राहून आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करत असतो. अलीकडे तो खूपच तणावग्रस्त राहत होता मी त्याला सहज विचारलं,विजय अरे काय समस्या आहे की तू एकदम अबोल आणि सतत चिंताग्रस्त दिसत आहेस,काही अडचण असेल व आमच्याकडून सहकार्य होण्यासारखी असेल तर नक्की सांगू शकतोस. तो म्हणाला सुभाष तू मला लहानपणापासून ओळखतो मी कोणी अडचणीत असेल तर तत्पर त्याच्या मदतीला धावतो.मी,हो मी तुला अनुभवलं आहे. तो पुढे म्हणाला, मित्रा मी ढोर मेहनत करून पै पै कमवतोय माझी बायको सुद्धा माझ्या खांद्याला खांदा लावून साथ देतेय,पण बाबा सुधारायच नाव घेत नाहीत. सगळा पैका व्यसनात जातोय.मी कर्म आणि काम चांगले करतोय पण मला फळ काही योग्य मिळत नाहीये.मी अबोल झालो म्हंटल ही समस्या फार गंभीर आहे.पण आपण आपलं कर्तव्य चालू ठेवायचं मित्रा विजय तुला एक गोष्ट सांगतो म्हणजे लक्षात येईल,ऐक तर...

एकदा एक साधू तपस्येसाठी जंगलात जातो,तिथे तो एका झाडाच्या जाळीत तप करत ध्यान लावतो.वर्ष भर बसून तप केल्यानंतर साधू एका पायावर उभा राहून ध्यान करू लागतो.ऊन,वारा ,पाऊस सर्वांचा सामना करत त्याची तपश्चर्या सुरू असते.उन्हाळ्याचे दिवस असतात.शाळेला सुट्टी पडलेल्या त्यामुळे गावातील शाळकरी मुले जंगलात फेरफटका मारत असतात.तिथून जाताना ते साधूला पाहत असतात व हसत असतात. आठवडी बाजाराला जायचा रस्ता सुद्धा त्या जंगलातून जात असतो,उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे पानगळ होऊन साधू लोकांना दिसू लागतो.एक सज्जन व्यक्ती बाजारातून घरी जाताना साधुकडे पाहते व मनात विचार करते की,किती दिवस झाले साधू ध्यान लावून उभा आहे. त्याच्या शरीरावर जखमा होऊन त्या कडक झाल्या होत्या त्यातून रक्त येत होते.त्या व्यक्तीने सुहृदयतेने आपल्या बाजाराच्या थैलीतून थोडे तेल घेतले व जखमेवर लावले, कारण जखम नरम होऊन साधूला आराम वाटेल.तो निघून गेला पण थोड्यावेळाने त्या तेलाच्या गंधाने जंगलातील मुंग्या साधूच्या अंगावर धावून आल्या व त्याला डसू लागल्या ती रात्र साधूला फार वेदना दायक ठरली. दुसरा दिवस उजाडला थोड्याफार फरकाने मुंग्या चावतच होत्या.काहीवेळा नंतर गावातील एक मुलांचा घोळका सकाळी फेरफटका मारत नदीवर पोहून परत निघाला होता.येताना उसाच्या शेतातून ऊस घेऊन खात निघाले होते.त्यांनी साधूला पाहिलं व त्यातल्या एका मुलाच्या डोक्यात कुरापत सुचली.त्याने इतरांना साधूला उद्देशून बघा कसा उभा आहे,किती दिवस झाले...म्हणून चेष्टेत त्यांच्यावर उसाचे चावलेले पाचट फेकून मारू लागला त्याचे पाहून इतरही मुलांना चेव आला व ते सुद्धा मारू लागले,ते उसाचे चोखलेले तुकडे साधूच्या अंगावर लागून दूर पडू लागले.परिणामी त्या उसाच्या गोड गंधामुळे सर्व मुंग्या साधूच्या अंगावरून उतरून तिकडे पळाल्या.साधूला खूप समाधान वाटले.त्याच्या तपश्चर्येर आलेली बाधा दूर झाली होती.

म्हणजे आपण केलेली योग्य कृती कधीकधी अयोग्य परिणाम देऊन जाते तर, अयोग्य कृती योग्य परिणाम देऊन जाते.म्हणून परिस्थिती व वेळ पाहून केलेली कृती योग्य असते.ज्या प्रमाणे साधू ने आपली तपस्या,वाटसरू ने आपली भूतदया व मुलांनी आपलं तारुण्यातील उन्माद दाखवला पण परिस्थिती योग्य परिणामांकडे घेऊन गेली.

त्यामुळे दुःखी न होता तू तुझं कर्तव्य करत रहा.जग बदलेल की नाही माहीत नाही पण तुझे विचार नक्की जग बदलण्यासाठी प्रेरक ठरतील... धन्यवाद!!

–श्री.सुभाष राठोड,–९०११८५८४८५

◆ पान १ वरून पुढे...

### आजपर्यंत प्रत्येक...

ब चे उमेदवार मुंडे दीपक प्रल्हादराव यांच्या प्रचारार्थ आ.धनंजय मुंडे यांची कॉर्नर सभा झाली. या सभेला प्रचंड संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. कॉर्नर बैठक असतानाही अलोट गर्दीने एखाद्या जाहीर सभेचे रूप यावेळी बघायला मिळाले. यावेळी पुढे बोलताना आ. धनंजय मुंडे यांनी सांगितले की, या भागातील विविध विकासाची कामे आपण केलेली आहेत. अनेक योजना देण्याचा प्रयत्न सातत्याने केला आहे. अशोकनगर मधील महानिर्मितीची जागा स्थानिकांना देण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या नावाने पी टी आर करून दिले. एका महिन्याच्या आत स्थानिकांना जागा देऊन त्यांचे पीटीआय त्यांच्या हातात दिले. मराठवाड्यामध्ये सर्वाधिक घरकुल परळीत मंजूर करण्यात आलेली आहेत. त्याचबरोबर चेंबरी रेस्ट हाऊस शेजारचा ६० फुटी रस्ता त्याचेही काम सुरू झाले असून लवकरच हे काम पूर्ण होणार आहे. संबंध परळीकरांच्या अनेक दिवसांच्या मागणीनुसार ६५ कोटी रुपयांचे क्रीडा संकुल आपल्या परळीमध्ये उभे राहत आहे. उच्च शिक्षण, रोजगार निर्मिती आणि भौतिक सुविधा या परिपूर्ण करून परळी शहराला अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न आपण केला आहे. अशोकनगर व परिसरात सहा कोटींचे रस्ते केलेले आहेत. बौद्ध विहाराचे कामाचे भूमिपूजन झाले असून लवकरच ते पूर्ण होणार आहे. येत्या वर्षभरात रेल्वेचा दुहेरी पूल उभारण्याचे काम सुरू करणार असून संत रोहिदास महाराज मंदिर व अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने दोन सभागृह जागेसह या ठिकाणी आपण देणार आहोत. वाल्मिकी समाजाचे सभागृह व कंपाऊंड वॉलचे कामही लवकरात लवकर पूर्ण होणार आहे. रेल्वे लाईनच्या दुहेरीकरणात जी घरे उठणार होती ती आपण स्थगित केली. विकास नक्कीच होईल परंतु रेल्वे मार्गामुळे कोणाचे नुकसान होणार याची काळजीही आपण घेतली. विकासाच्या अजेंडा घेऊनच आपण परळीकरांसमोर आलो आहोत. परळीच्या सर्वांगीण विकासाची संपूर्ण ब्ल्यू प्रिंट आमच्याकडे आहे. हा विकास अधिक गतिमान करण्यासाठी या नगरपालिका निवडणुकीत नगराध्यक्ष पदासह सर्वच्या सर्व महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्य द्यावे असे आवाहन त्यांनी केले.

### शहराच्या विकासाचा...

या सभेला मतदारांची आलोट गर्दी दिसून आल्याने बीड करांच ठरलं तुतारी वाजणार अशी चर्चा सुरू झाली होती. ही तीन प्रभागाची नाही तर शहराची सभा असल्याचे गर्दी वरुन दिसून येत होते. तर प्रभाग १२ आणि १७ येथे ही प्रचारार्थ कॉर्नर सभा पार पडल्या. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आघाडीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे यांच्या प्रचारार्थ तसेच प्रभाग ११ च्या उमेदवार मोमीन खमरुनीसा शरफुद्दीन, पठाण आफसरखान करीमखान, प्रभाग १० चे उमेदवार शिवाजी विश्वनाथ जाधव, ज्योती लक्ष्मीकांत रुईकर तसेच प्रभाग च्या ९ रेखा पिंगळे, शेख अथर (बब्बू भाई) या तीन प्रभागाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आ. संदीप क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.२८) सायंकाळी राजीव गांधी चौक भागात तर कॉर्नर सभा झाली. तर प्रभाग १७ चे शेख शाकेर फकिर महमद, अमृता मुकूंद भोसले यांच्या प्रचारार्थ कारंजा चौक भागात कॉर्नर सभा झाली. यानंतर प्रभाग १२ चे उमेदवार ड.आदर्श अरूण जाधव, शेख जैनाबबी वसीम यांच्या प्रचारार्थ बालेपीर भागात सभा घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांनी मतदारांशी संवाद साधला. यावेळी मतदारांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती असल्याने कोणी काही ही म्हटले तरी बीडच्या मतदारांच्या मनात तुतारी अन् मशालच असल्याचे चित्र दिसून येत आहे. यावेळी वैयक्तिक गाठीभेटी घेत मतदारांशी आ. संदीप क्षीरसागर हे संवाद साधत आहेत. त्यांच्या या प्रचाराला मतदरांचा जातील तिथे मोठा प्रतिसाद मिळत आहे. यामुळे बीड नगरपरिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचाच झेंडा फडकणार असे चित्र दिसून येत आहे. तर यावेळी बोलताना आ. संदीप क्षीरसागर म्हणाले की, मी बोलत नाही तर करुन दाखवितो हे

◆ पान १ वरून पुढे...

शहराला आणि मतदारसंघाला असून, शहराच्या विकासाचा मास्टरप्लॅन आमच्याकडे तयार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगून शेवटी त्यांनी नगरपरिषदेत काम करण्याचा आणि शहराचा अभ्यास असलेल्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे यांच्या नावासमोरील तुतारी चिन्हावर आणि शहरातील २६ प्रभागातील ५२ नगरसेवक पदाच्या तुतारी आणि मशाल या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन केले. यावेळी माजी आ. सय्यद सलीम, राजेंद्र मस्के, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे व नगरसेवक पदाचे उमेदवार आणि मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शहरात एकाही...

नव्हे तर प्रभाग क्रमांक ३ च्या मतदारांची परीक्षा असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. २ तारखेला मतदार कामाच्या मानसाला बळ देणारं की, भूलथापांना बळी पडणार अशी ही चर्चा सुरू आहे. बीड नगरपरिषद निवडणुकीसाठी आता केवळ तीन दिवस शिल्लक असल्याने प्रचार शिगेला पोहोचला आहे. मागील पाच वर्ष हातावर हात धरुन बसत लोकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करीत त्यांची होत असलेल्या बेजारीचा तमाशा पाहणारे उमेदवारांना अचानक लोकांच्या समस्या आणि अडचणींचा साक्षात्कार झाला आहे. यामुळे ते आज मतदान घेण्यासाठी प्रत्येकजण डोंगर मंजूर,नदी मंजूर असा खेळ खेळत आहेत. पण मागी ९ वषारपासून अमर नाईकवाडे नावाचा समाजसेवक या प्रभागाला आणि माणसांना तळ हाताच्या फोडाप्रमाणे जपत आहे. त्यांनी या काळात बीड शहरात सर्वाधिक विकास निधी प्रभाग ३ मध्ये आणून या प्रभागाचा विकास केला. तसेच मतदारांची कोणतीही समस्या असू दे एक फोन केला की, अमर नाईकवाडे हे लोकांच्या मदतीला धावून येतात. मग ते नाली काढण्याचा प्रश्न असू दे अथवा कोरोना सारखा काळ जेंव्हा मृत्यूच्या भीतीने रक्ताचे नाते खुजे झाले होते. तेंव्हा किट घालून कोराना वार्डात जाऊन आधार देणारा आणि मदत करणारा कार्यकर्ता हा दुसरा कोणी नाही तर अमर नाईकवाडे होता. प्रभागातील अनेकांना घराची मालकी नव्हती पण अमर नाना यांनी पीटीआर काढून दिले. समस्या अनेक पण त्याचे उत्तर अमर नाना हे एकच आहे. त्यांनी केलेली कामे आणि मदतीला धावून येण्याची सवय हे पाहता अमर नाना म्हणजे चालते बोलते मदत केंद्र असल्याची प्रतिक्रिया व्ये केली जात आहे. त्यांनी विकास कामे करुन मतदारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली आहेत. त्यांची परीक्षा मागेच झाली असून, आता त्यांचा पेपर सोडवून दोन तारखेला मार्क देण्याची जबाबदारी मतदारांची आहे. यामुळे दोन तारखेला अमर नाईकवाडे यांची नव्हे तर प्रभाग क्रमांक ३ मधील मतदारांची परीक्षा असून, ते विकास कामे आणि मदत करणारा कामाचा माणूस अमर नाईकवाडे यांच्या पाठीशी उभे राहणार की, भूलथापांच्या हे ३ तारखेला जाहीर होणार आहे. अमर नाईकवाडे सारखा वेळ काळ न पाहणाऱ्या ३६५ दिवस २४ तास जनसेत असणारा कार्यकर्त्याला बळ दिले तर चांगले परीक्षक म्हणून मतदार शोभतील अशी सांगितले जात आहे.

### सोमवारी फडणवीस...

रिंगणात असलेले उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या जाहीर सभेमुळे भाजपच्या प्रचाराला मोठी ऊर्जा मिळणार असून, पक्षाच्या पारड्यात निर्णायक मताधिक्य पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नगरपालिका निवडणुकीसाठी भाजपने विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून प्रचाराचा वेग वाढवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेमुळे मतदारांमध्ये सकारात्मक संदेश जाण्याची अपेक्षा भाजप कार्यकत्यारकडून व्ये केली जात आहे. या सभेच्या माध्यमातून शहरातील विकासकामे, पुढील नियोजन तसेच केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची माहिती थेट नागरिकांपयरत पोहोचवली जाणार आहे. दरम्यान, मुख्यमंत्री, मंत्री, आमदार आणि स्थानिक नेत्यांच्या उपस्थितीत होणारी ही सभा निवडणुकीच्या प्रचारात निर्णायक ठरण्याची शक्यता असून, बीडच्या राजकीय वातावरणात मोठी हालचाल निर्माण झाली आहे.

◆ पान १ वरून पुढे...

### कोणाच्याही दबावाला....

शिवसंग्राम व मित्रपक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेत मतदारांना आवाहन केले. बीड शहरात कोणाचीही दादागिरी खपवून घेतली जाणार नाही. कोणाच्याही दबावाला बळी न पडता विकासाच्या मुद्यांवर मतांचे आशिर्वाद देऊन बीड नगर परिषदेत परिवर्तन घडवा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष–शिवेसना–शिवसंग्राम–सपा व मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह प्रभाग क्र. ३ मधील नगरसेवक पदाचे उमेदवार सौ. सरवदे रेशमा रामदास आणि अमर मारुतीराव नाईकवाडे तसेच प्रभाग क्र. ९ मधील उमेदवार शेख शाहेद मुजफ्फर, सौ. पोपळे पुष्पा प्रभाकर यांच्या प्रचारार्थ रामतिर्थ, हनुमाननगर आणि आदर्श नगर येथे झालेल्या प्रचार सभेला आ. विजयसिंह पंडित, माजी नगरसेवक दिलीप गोरे, इरफान बागवान, रामदास सरोदे, बबनराव डोईफोडे, नागसिंग मस्के, सुभाष मोरे, दिगांबर फाटे, शिऊरभाई शेख, सुहास पाटील, अनिल घुमरे, श्रीमती प्रज्ञाताई खोसरे, शेख मुजीबभाई, ड.बाळासाहेब कोल्हे, इरफान बागवान, हमरून इरफान, सुनिल चव्हाण, चौरे आर.एस. यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मी आत्तापर्यंत प्रामाणिक काम केले – अमर नाईकवाडे

यावेळी बोलताना उमेदवार अमर नाईकवाडे म्हणाले की, गेली अनेक वर्षे माझ्या मतदार बंधु–भगिनींनी विश्वास दाखवला तो मी सार्थ केला, मिळालेल्या संधीचा उपयोग मी प्रामाणिकपणे करून विकास कामे केली. यापुढील काळात उर्वरित विकास कामे गतीने पूर्ण करून रामतिर्थ आणि परिसराचा कायापालट करू. राशन दुकान, आरोग्य सुविधा, अंगणवाडी आदी सुविधा उपलब्ध करून देऊ, त्यासाठी पुन्हा एकदा आशिर्वाद देऊन नगर परिषदेत पाठवा असे आवाहन त्यांनी केले.

क्षीरसागर परिवाराने बीडकरांचा विश्वासघात केला – दिलीपराव गोरे

बीड शहरातील नागरीकांनी मोठ्या विश्वासाने गेली ३५ वर्षे नगर परिषद क्षीरसागर परिवाराच्या हातात दिली, परंतु त्यांनी नगर परिषदेच्या माध्यमातून कोणाचा विकास केला ? हे आता सांगायची गरज नाही. ३५ वर्षांपासून रस्ते, नाल्या, पाणीटंचाई असे गंभीर प्रश्न अजूनही रखडत पडलेले आहेत. आता आपल्याला संधी आलेली आहे परिवर्तन करायची. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहराचा कायापालट होणार आहे त्यासाठी घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून नगराध्यक्षांसह सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन माजी नगरसेवक दिलीपराव गोरे यांनी केले.

याप्रसंगी भागवत तावरे, इरफान बागवान, रामदास सरोदे यांनीही मनोगत व्यक्त केले. दरम्यान आ. विजयसिंह पंडित यांच

या झंझावती प्रचार सभेने बीड शहरात राष्ट्रवादी व मित्रपक्षाची ताकद भक्कम झाली असून घड्याळाचा गजर होणार, परिवर्तन होणार, बीड शहर हुकूमशाहीच्या कचाट्यातून मुक्त होणार अशा भावना मतदार बांधवातून व्यक्त केल्या जात आहेत.

### परळीच्या पद्मावती...

यांच्यासह प्रभाग क्रमांक ७ मधील उमेदवार सौ. उषा किशोर केंद्रे तसेच सचिन रामनाथ सारडा यांना मतदान करण्याचे आवाहन श्री. मुंडे यांनी नागरिकांशी संवाद साधत केले. दरम्यान धनंजय मुंडे यांच्या या रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पहायला मिळाला, अगदी घरोघर त्यांचे स्वागत – सत्कार करण्यात आले. विकासाच्या वाटेवर मार्गक्रमण करत असलेल्या परळी शहराला संपूर्ण विकसित करण्याचा आपला अजेंडा असून, यासाठी परळीकर नागरिक संपूर्ण ताकतीने आमच्या पाठीशी उभे राहतील, असा विश्वास यावेळी मुंडेंनी व्यक्त केला. यावेळी जुगलकिशोर लोहिया, विजय भोईटे, शंकर आडेपवार, दीपक तांदळे, योगेश जाजू, दीपक कुलकर्णी, शाम तोष्णीवाल, उमेदवार सचिन सारडा, किशोर केंद्रे, नितीन आडेपवार, सचिन स्वामी, राम पेंतेवार, मयूर मुलजकर, ओंकार

◆ पान १ वरून पुढे...

भोईटे, संतोष घोडके, सय्यद शेरू, राजू भाई, बापू गायकवाड, गंगाराम वाघमारे, शिवा होके, फिरोज भाई यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.

### डॉ. गौरी पालवे...

असून, पुढील दोन–तीन दिवसांत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांच्या सर्व पुरवणी जबाबांची नोंद केली जाणार आहे. कुटुंबीयांनी आरोपीचे भाऊ अजय गर्जे आणि बहीण शीतल आंधळे यांनाही अटक करावी, अशी मागणी केली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. गौरीवर पूर्वी अनेकदा मारहाण झाल्याचे त्यांनी सांगितल्याने या प्रकरणाचे मूळ कारण नीट समजून घेणे अत्यावश्यक असल्याचेही डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले. उपसभापती म्हणून जबाबदारी आहेच, पण आई म्हणूनही हे प्रकरण मन हेलावून टाकणारं आहे. कुटुंबीयांना सक्षम सरकारी वकील मिळावा म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्याशी मी स्वतः बोलणार आहे. तपासात कुठलाही दबाव सहन केला जाणार नाही, असे त्यांनी सांगितले. न्यायप्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी डॉ. गोऱ्हे यांनी मुंबई पोलिसांना दोन महत्त्वाचे निर्देश दिले– पहिला, तपासाच्या प्रगतीबाबत अधिकृत बुलेटीन दर दोन दिवसांनी पत्रकारांना देण्यात यावे, जेणेकरून अफवा आणि अप्रमाणित माहितीला आळा बसेल. दुसरा, अशा संवेदनशील खटल्यांमध्ये न्यायालयीन सुनावणीदरम्यान पीडितेवरच आरोप केले जातात; म्हणून संपूर्ण सुनावणीचे इन कॅमेरा व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यासाठी न्यायालयात विनंती करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच जवळील गावातील एका पॉक्सो प्रकरणातील तक्रार नोंदवण्यात उशीर झाल्याबाबतही त्यांनी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. महिलांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांच्या तक्रारींची त्वरित आणि गांभीर्याने नोंद होणे आवश्यक आहे. गावांमध्ये पॉक्सो कायद्याबाबत जागृती वाढवण्यासाठी ग्रामसभा घेणे आवश्यक आहे, असे डॉ. गोऱ्हे म्हणाल्या. पॉक्सो प्रकरणातील पीडित मुली आणि पालकांना तपासाच्या प्रगतीची नियमित माहिती देण्याबाबत भारतीय न्यायसंहितेतील नव्या तरतुदींची माहितीही त्यांनी दिली. गौरीच्या कुटुंबाला भेट देऊन त्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्याचा प्रयत्न केला. न्याय मिळण्यासाठी सरकार आणि पोलीस यंत्रणा तितक्याच कटाक्षाने काम करतील,

### उमेवाराना दिलासा....

चिन्ह वाटप करण्यात आले. मतदान २ डिसेंबरला असल्याने अपक्ष उमेदवारांना प्रचारासाठी केवळ चार दिवस मिळाल्याने हा अत्यंत तोकडा असल्याने उमेदवारांची अवस्था म्हणजे रात्र लहान आणि सोंगं जास्त असे झाले होते. परंतु निवडणूक आयोगाने निर्णय घेत प्रचाराची वेळ वाढवली आहे. यामुळे उमेदवारांना दिलासा मिळाला आहे. आधी मतदानाच्या २४ तास आधी प्रचार संपत होता. पण यावेळी मतदानाच्या आदल्या दिवशी म्हणजे दि. १ डिसेंबर रात्री १० वा जेपयरत प्रचार करता येणार आहे. यामुळे सोमवारी रात्री १० पयरत उमेदवारांच्या प्रचाराच्या फायरी झडणारआहेत.

### 35 वर्ष काम...

डॉ.ज्योती रविंद्र घुंबरे यांच्यासह २६ प्रभागांतील ५२ उमेदवारांच्या प्रचारार्थ शहरातील सम्राट लॉन्सच्या सभागृहात प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी जयदत्त क्षीरसागर हे बोलत होते. बैठकीस भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, बाबूशेठ लोढा, दिनकर कदम, विलास बडगे, गंगाधर घुंबरे, अरुण डाके, नवनाथ शिराळे, अशोक लोढा, माधवराव मोराळे, विजूताई महिंद्रे, डॉ.ज्योती घुंबरे, तानाजी कदम, सुधाकर मिसाळ, डॉ. रविंद्र घुंबरे, लाला पाटील चौरे, सखाराम मस्के, सुभाष क्षीरसागर, गणपत डोईफोडे, भागवत पवळ, अरुण बोंगाणे, शरद ढाकणे, अर्जुन बहीरवाळ, नवनाथ कुलकर्णी, विजय सरवदे, प्रकाश इंगळे, चंद्रकांत पेंढारे, संदीप डावकर, भाग्यश्री ढाकणे, सतीश पाटील, अंबादास गुजर, अमोल वरपे, सुरेश काशीद यांच्यासह अनेक पदाधिकारी व प्रभागातील उमेदवार उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

### श्रीमती प्रेमलता...

अंतिम टप्प्यात ना. अजितदादा पवार यांच्या जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील बशीरगंज चौक येथे आज सायं. ५.३० वाजता होणाऱ्या या सभेची जय्यत तयारी करण्यात आली असून या सभेने राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदासह सर्व ५२ नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या विजयावर शिक्का मोर्तब होणार आहे. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित राहणार असून या जाहिर सभेस बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित, डॉ.ज्योतीताई मेटे, अनिलदादा जगताप, खमरूल इमान यांच्यासह कल्याणराव आखाडे, दिलीप गोरे, शेख मुजीब, अमर नाईकवाडे, फारुक पटेल, बळीराम गवते, अशफाक इनामदार, झुंजार धांडे, शेख निजाम, भिमराव वाघचौरे, विनोद मुळूक, बाळासाहेब गुंजाळ, रामसिंग टाक, विनोद हातागळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस–शिवेसना–शिवसंग्राम–सपा आणि मित्रपक्षाच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### उपसभापती डॉ. नीलम...

विकास योजना आणि पक्ष संघटनवाढ यावरही त्यांनी चर्चा केली. या प्रसंगी शिवसैनिक, विविध विभागांचे पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भेटीदरम्यान परिसरात उत्साहाचे व स्नेहाचे वातावरण अनुभवायला मिळाले. उपसभापतींच्या या भेटीमुळे बाजीराव चव्हाण यांच्या कार्याला आणि जनसंपर्क कार्यालयाला नवी प्रेरणा मिळाल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

### परळीत रोजगार...

धनंजय मुंडे यांनी परळी शहरातील आझाद नगर येथील कॉर्नर सभेत बोलताना व्यक्त केला. परळी नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना (शिंदे गट), रिपाइं (आठवले गट) व मित्र पक्ष महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, प्रभाग ८ मधील अधिकृत उमेदवार महानंदा व्हावळे, शकील

◆ पान ४ वरून पुढे...

कुरेशी, प्रभाग ९ मधील उमेदवार कार्तिक कांबळे, खैसरबी राजा खान यांच्या प्रचारार्थ शहरातील आझाद नगर येथे आयोजित कॉर्नर बैठकीस अक्षरशः जाहीर सभेचे स्वरूप आले होते. इथल्या लोकांच्या घरात पाणी किती वाजता येते, त्याची माहिती मला असते, कारण इथल्या प्रत्येक माणसाशी मी थेट जोडलेला आहे. इथल्या जनतेने मला हजारो मतांची आघाडी विधानसभेत दिली तशीच माझ्या प्रत्येक निवडणुकीत दिली. त्यामुळे त्यांची अखेरच्या श्वासापर्यंत सेवा करणे, हा माझा धर्म आहे, असेही धनंजय मुंडे म्हणाले.

आगामी काळात विकासाची ग्वाही आणि जनतेचा विश्वास सार्थकी लावायचा शब्द देतो, असेही श्री. मुंडे म्हणाले. यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांचे प्रतिनिधी बाजीराव धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अय्युब भाई पठाण, डॉ. संतोष मुंडे, रिपाइंचे सचिन कागदे, जाफर खान, राजा खान, अजीज कच्छी, नाझर भाई, शकील कच्छी, भीमा पोळ, युनूस बेग, राहुल घोबाळे, अल्ताफ पठाण, अनंत इंगळे, रवी मुळे, महेबुब कुरेशी, माधवराव ताटे, जावेद कुरेशी, शरण मस्के प्रभाग क्र ८ मधील उमेदवार महानंदा व्हावळे, शकील कुरेशी, प्रभाग क्र ९ मधील उमेदवार कार्तिक कांबळे, खैसर राजा खान यांसह पदाधिकारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रभाग पाच मधील...

प्रसिद्धी पत्रकात म्हटले

दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की मा.लक्ष्मण पवार यांनी भगवान घुबार्डे यांच्या माध्यमातून अनेक गोरगरिबांना घरकुल योजनेचा लाभ मिळाला आहे तसेच विविध योजनेतून अनेकांना लाभ मिळावा म्हणून आम्ही सातत्याने पाठपुरावा केला आहे तसेच विविध विकासकामे करण्यासाठी सौ.रेवतीताई भगवान घुबार्डे व सौ.कविता एकनाथ लाड सौ लाड यांचा विजय निश्चित आहे तरी मतदारांनी कोणाच्या भुलथापांना बळी न पडता कमळ चिन्हा समोरील बटन दाबुन आदरणीय गिताभाभी पवार यांच्यासह सर्व भाजपा उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन युवानेते बाबा वाघमारे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे

◆ पान ४ वरून पुढे...

### गेवराई शहर...

सोडविण्यासाठी आम्ही कटिबध्द असून राष्ट्रवादीचे पॅनल शहराच्या विकासाचे व्हिजन घेऊन निवडणुकीला सामोरे जात आहेत. माजी आ. अमरसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जनसामान्यातील उमेदवार या निवडणुकीत उभे केले आहेत. त्यामुळे सामान्य मतदारातून अनुकूल प्रतिक्रिया उमटत असून माजी आ. अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांचे विकासाचे व्हिजन सार्थ करण्यासाठी राष्ट्रवादीचे सर्वच्या सर्व उमेदवार विजयी करा असे आवाहन रणवीर पंडित यांनी केले. यावेळी त्यांच्यासमवेत शांतीलाल पिसाळ, हन्नान इनामदार, हारूण पटेल, सय्यद एजाज अत्तार, मोहसीन बागवान, शाम रुकर, गोपाळ पिसाळ, रविशंकर वाडकर, मोहन पिसाळ, दिलीपसेठ गंगवाल, काशिनाथ पिसाळ, श्रीहरी पिसाळ, प्रभू धापसे, मनोज धापसे, रवि फुलशंकर, अश्विन जवंजाळ यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नगराध्यक्ष पदाचे...

व्यासपीठावर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलताताई पारवे, भागवत तावरे यांच्यासह प्रभागातील प्रतिष्ठित नागरिक, महिला आणि युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले, अमर नाईकवाडे यांनी सातत्याने प्रभागातील विकास कामांचा नव्हे तर प्रत्येक नागरिकांच्या अडीअडचणीचा विचार केलेला आहे. नगरसेवक म्हणून नव्हे तर प्रभागातील जनसेवक म्हणून त्यांनी काम केलेले आहे. अमर नाईकवाडे यांच्या नेतृत्वाची उंची आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेल्या कार्यकर्त्याला जपण्याची, त्यांना ताकद देण्याची जबाबदारी तुमची आमची सर्वांची आहे. दिवस–रात्र प्रभागातील नागरिकांसाठी तत्पर असणारा आणि प्रत्येक वेळी त्यांच्या सुखदुःखासाठी धावून जाणाऱ्या अमर नाईकवाडे यांच्या पाठीशी मोठ्या ताकतीने उभे राहण्याची गरज आहे. कोणत्याही प्रकारच्या आमिषाला आणि अपप्रचाराला बळी न पडता या प्रभागातील मतदारांनी अमर नाईकवाडे आणि श्रीमती रेश्माताई सरवदे व नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेम लताताई पारवे यांच्या घड्याळ या चिन्हा

◆ पान ४ वरून पुढे...

समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

### परळी नगरपरिषद...

झंझावात निर्माण केला होता. त्याच पद्धतीने नगरपरिषदेवर महायुतीचा झेंडा फडकवण्यासाठीही सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे स्वतः मैदानात उतरल्या आहेत. यावेळी नागरिकांच्या गाठीभेटी घेत परळी नगर परिषदेत नगराध्यक्ष पदाला व सर्व नगरसेवक पदाला महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, परळी वैजनाथ शहर महायुतीच्या बाजूने कायमच राहिले आहे. आमच्यावर लोकांनी प्रचंड प्रेम केलेले आहे. साहेब व ताई यांच्या बाजूनेच आजचेही वातावरण आहे. त्यामुळे येथे विकासावरच मतदान होईल.साहेबांवर लोकांचे प्रेम आहे कारण जसं साहेबांना कळतंय तसं साहेबांनी परळीचा विकास, विकास आणि विकासाच केलेला आहे. त्यामुळे या निवडणुकीत महायुतीचे नगराध्यक्षपदासह सर्वच्या सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील. साहेब व ताई या दोघांच्या पाठीशी परळी नक्की आपल्या आशीर्वाद उभे करणार याची आपल्याला खात्री आहे. तमाम परळीकरांनी महायुतीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे, विकासाला आम्ही कुठेही कमी पडणार नाही अशी ग्वाही सौ .राजश्रीताई मुंडे यांनी यावेळी दिली.

### प्रसिद्धीसाठी बिनबुडाचे...

गंभीर असून त्याची सखोल चौकशी व्हावी, याबाबत कोणालाही दुमत नाही. पण त्या घटनेचा संबंध नसताना आमदार धस यांना मुद्दाम टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. नाहक बदनामी करण्याची ही प्रवृत्ती अत्यंत केविलवाणी आहे. सोशल मीडियावर काही लोक राजकीय फायद्यासाठी आमदार धस यांच्यावर दररोज सकाळ, दुपार, संध्याकाळी उठसूट कोणतेही आणि कसलेही खोटे आरोप करत असल्याचा आरोप करत, ठोस पुरावे नसताना माध्यमांत येऊन बदनामी करण्याचा प्रयत्न करणे ही गंभीर बाब आहे. अशांवर योग्य कायदेशीर कारवाई करावी असेही जरांगे यांनी सांगितले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## लिंबागणेश ग्रामपंचायतीचा युवा शेतकरी संघर्ष समितीच्या ऊस दरवाढीसाठी कोयता बंद आंदोलनाला पाठिंबा



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा, तसेच हंगामासाठी न्याय्य भाव निश्चित करण्यात यावा, या मुख्य मागण्यांसाठी युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने ऊसतोडणी बंद आणि ऊसवाहतूक बंद आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायतीने अधिकृत ठराव घेऊन जाहीर पाठिंबा दिला आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या पुढाकाराने ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच बालासाहेब जाधव, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, महादेव कुदळे, अर्जुन घोलप, समीर शेख व अँड . गणेश वाणी, सुरेश निर्मळ, दादा गायकवाड, संतोष भोसले,नामदेव वाणी, संजय पावले, विनायक वाणी, शिवाजी वाणी, सिताराम थोरात, भगवान थोरात आदी ग्रामस्थांच्या स्वाक्षरीने एकमताने हा ठराव पारित केला.

# सन-२०२६-२७ साठी नियोजनचा आराखडा वेळेत सादर करा -जिल्हाधिकारी जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा नियोजन समिती अंतर्गत सन २०२६-२७ साठीचे परिपूर्ण नियोजन आराखडे सर्व यंत्रणांनी १५ डिसेंबर २०२५ पूर्वी सादर करावेत असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज येथे दिले. समितीच्या कामकाजासाठीची आढावा बैठक आज त्यांच्या अध्यक्षतेखाली येथील नियोजन समिती सभागृहात झाली. यावेळी विविध यंत्रणांचे दायित्व तसेच चालू वित्तीय



वर्षातील कामांची प्रगती यांचा आढावा घेण्यात आला. जिल्हा नियोजन अधिकारी डॉ. सुधाकर चिंचाणे तसेच सामजिक न्याय विभागाचे उपायुक्त प्रदीप भोगले यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यंत्रणांनी यापूर्वीच्या कामाच्या दायित्वाबाबत तातडीने घालून लक्ष घालून ती कामे पूर्ण करावित असे सांगून जिल्हाधिकारी म्हणाले की नियोजन विभागाची कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. ज्या विभागांनी तांत्रिक मान्यता प्राप्त करून घेतली आहे त्यांनी तात्काल प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव सादर करावेत.सर्व विभागांनी तझऊ- नसेच चक णखऊ देखील तत्काळ पूर्ण करावे त्यासोबतच पुढील काळात गतिमान पद्धतीने काम होण्याच्या दृष्टीकोणातून ख-झरी आता मोबाईल ॲप्लीकेशन उपलब्ध करून देण्यात आले आहे हे ॲप्लीकेशन सर्वांनी गुगल प्ले स्टोअरवरून डाऊनलोड करावेत आणि आगामी काळात सर्व प्रस्ताव डिजिटल पद्धतीने सादर करावेत अशी माहिती नियोजन अधिकारी डॉ. चिंचाणे यांनी दिली. यंत्रणांनी आगामी वर्षासाठीचे प्रस्ताव सादर करताना ते परिपूर्ण असतील याची खबरदारी घ्यावी. तसेच झच् गतीशक्ती अंतर्गत आवश्यक, लॉगीन तयार करावी या कामासाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नेमण्यात यावेत अशी सूचना जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी यावेळी दिली. बैठकीच्या आयोजनासाठी सहा नियोजन अधिकारी राधाकिशन इधारे व त्यांच्या सहका-यांनी परिश्रम घेतले.

## लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना चालु हंगामासाठी प्रतीटन रु. २७००रू अंतीम भाव जाहीर

### राज्य बँकेच्या धोरणानुसार पहिली ऊचल प्रतीटन रु.२४००रू देणार ; आ. प्रकाशदादा सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

शेतकरी संघटना व युवा शेतकरी संघर्ष समिती यांच्या प्रतिनिधी समवेत कारखाना सभागृहात झालेल्या संयुक्त बैठकीत सन. २०२५-२६ साठी अंतीम भाव रु.२७००/- प्रती मे.टन आणि राज्य बँकेच्या धोरणानुसार पहिली ऊचल प्रती टन रुपये २४००/- देणार असल्याची घोषणा आ. प्रकाशदादा सोळंके यांनी या बैठकीत केली. कारखान्याचा सन.२०२५-२६ चा गळीत हंगाम सुरु असुन दिनांक २५/११/२०२५ अखेर १,३०,१०० मे.टन ऊसाचे गाळप कारखान्याने केले आहे. कारखाना कार्यक्षेत्रात ऊस भावा संदर्भात युवा शेतकरी संघर्ष समिती व शेतकरी संघटना यांच्या वतीने आंदोलन करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत ऊस दरवाढी बाबतीत ठोस निर्णय होवू न शकल्यामुळे शेतकरी संघटनेने ऊस तोड बंद करुन ऊसाची भरलेली वाहने कारखान्यावर जाण्यासाठी प्रतिबंध केलेला होता. परिणामी यामुळे कारखान्याचे ऊस गाळप दिनांक २६/११/२०२५ पासुन बंद होवुन तुटलेला ऊस वाळत असल्यामुळे ऊस उत्पादकांचे आर्थीक नुकसान होत आहे.शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्यामुळे या पार्श्वभुमीवर दिनांक २८/११/२०२५ रोजी वरील संघटनेचे प्रतिनिधी यांना कारखाना सभागृहात चर्चेसाठी आमंत्रीत करण्यात आले होते. या बैठकीत आ. प्रकाशदादा सोळंके यांनी चालु हंगामासाठी अंतीम भाव प्रती टन रुपये २७००/- आणि राज्य बँकेच्या धोरणानुसार पहिली ऊचल रुपये २४००/- देणार असल्याचे संघटनेस आश्वासीत करुन या हंगामाचे १०.०० लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी सहकार्य करुन गाळपास येणा-या ऊसा करीता प्रतिबंध न करण्याचे संघटनेच्या प्रतिनिधींना आवाहन केले. या बैठकीस मा.आ.श्री. प्रकाशदादा सोळंके यांच्यासह व्हाईस चेअरमन श्री. जयसिंगभैय्या सोळंके, कारखान्याचे कार्यकारी संचालक, चिफ अकोटंट, मुख्य शेतकी अधिकारी तसेच शेतकरी संघटना, युवा शेतकरी संघर्ष समिती यांचे प्रतिनिधी ॲड. अजय बुरांडे, कालीदास आपेट, दत्ता डाके, जगदीश फरताडे, मोहन जाधव, अजय राऊत, नामदेव सोजे यांचेसह संघटनेचे इतर प्रतिनिधी उपस्थित होते.

## नरेगा वर्ककोड डिलीट; लाभार्थ्यांसाठी तातडीने उपाययोजनांची मागणी

### शिवसेना जिल्हाप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली सतीश शेळके यांची निवेदनद्वारे मागणी ; लाभार्थ्यांनी तात्काळ पंचायत समिती येथे कागदपत्रांसह संपर्क साधावा

**बीड । प्रतिनिधी**

नरेगा योजनेअंतर्गत राजुरी नवगण व कामखेडा गणातील सर्व प्रकारच्या कामांचे वर्क कोड डिलीट झाल्याने लाभार्थ्यांपुढे मोठे संकट निर्माण झाले आहे. अनेक गावांमध्ये कामे थांबली असून मजुरांना रोजगार मिळण्यात अडचणी येत आहेत. या गंभीर प्रश्नी तातडीने कार्यवाही करून निलंबित कामे सुरू करणे व मस्टर तात्काळ चालू करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासाठीचे निवेदन



वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.शिवसेना जिल्हाप्रमुख श्री. अनिलदादा जगताप साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सतीश शेळके पाटील यांच्या वतीने मा.ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री, मा.ना. श्री. भरतशेठजी गोगावले साहेब, मंत्री रोजगार हमी योजना यांनी मा. आयुक्त साहेब, नरेगा विभाग, नागपूर, मा. जिल्हाधिकारी साहेब, बीड, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब, जि.प. बीड, मा. उपजिल्हाधिकारी साहेब (रोहयो), बीड, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी साहेब (पंचायत), जि.प. बीड सत्वर कार्यवाहीसाठी आदेशीत केले आहे. तसेच गटविकास अधिकारी श्री.राठोड साहेब यांनी लाभार्थ्यांना महत्त्वाची सूचना दिली आहे. कामांच्या पुनर्मंजुरीसाठी (दुबार वर्क कोड) मूळ संचिका व चालू तारखेचा ७/१२ उतारा घेऊन तातडीने पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा, असे त्यांनी आवाहन केले.




*मतदान जागृती निमित्त विद्यालयांमध्ये मतदान जागृती करणारे पोस्टर्स तयार करून घेण्यात आले.*



*वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात परभणी येथील कुलगुरू डॉ इंद्र मनी सर यांच्या सोबत चर्चा करताना रामप्रसाद डोईफोडे*

## 'प्रिय नदीस' ठरला सर्वोत्कृष्ट लघूचित्रपट

### सिने अवार्ड पुणे चा दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित



● सामाजिक वास्तव आणि भावनिक किनार असणाऱ्या 'प्रिय नदीस' ने प्रेक्षकांबरोबरच समीक्षकांचीही दाद मिळवली आहे. या पुरस्कारामुळे मराठवाड्यातील ग्रामीण चित्रपटाची प्रतिष्ठा हळूहळू वाढत असल्याचे आशादायक चित्र निर्माण होत आहे. -विष्णू उगले (दिग्दर्शक)

● माजलगाव सारख्या ग्रामीण भागात बनलेल्या 'प्रिय नदीस' ने आम्हाला खूपच सन्मान मिळवीन दिला आहे यात शंका नाही. त्यामुळे जिम्मेदारी वाढलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून पुन्हा एकदा एका वेगळ्या विषयावरील फिल्मचे काम प्रगतीपथावर आहे. -भास्करनाना शिंदे (निर्माता)

**माजलगाव । प्रतिनिधी**

पूणे येथे नुकत्याच पार पडलेल्या सिने अवार्डा काडमी पूणे - २०२५ व युवा महाराष्ट्र फाऊंडेशन यांच्या वतीने भास्करनाना शिंदे फिल्म प्रॉडक्शन निर्मित व लेखक आर. प्रकाश यांनी लिहलेल्या 'प्रिय नदीस' या लघुपटाने बाजी मारत आर्ट फिल्म (कलात्मक विभाग) या गटातुन प्रथम क्रमांकाचा दादासाहेब फाळके पुरस्कार पुरस्कार मिळवला.

यावेळी सामाजिक क्षेत्र व सिने क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते 'प्रिय नदीस' च्या सर्व टिमचा सन्मान करण्यात आला. या यशासाठी माजलगाव विधानसभा सदस्य ना. आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी सर्व टिमला आपल्या निवासस्थानी बोलवुन त्यांचा विशेष सत्कार केला व आपल्या शुभेच्छापर भाषणात आमदार प्रकाश दादा सोळंके बोलताना म्हणाले की, 'प्रिय नदीस' ची संपूर्ण टिम माजलगावच्या मातीतली असल्यामुळे मी खूप भारावुन गेलो आहे. प्रिय नदीस लघुपटाच्या यशाबद्दल त्यांनी निर्माते भास्करनाना शिंदे व दिग्दर्शक विष्णू उगले यांचे विशेष कौतुक करुन बाल कलाकार प्रसेनजित शिंदे यांच्याही पाठीवर त्यांनी कौतुकाची थाप मारली.

या लघुपटाचे छायाचित्रण व संकलन अमर देवणे यांनी केले आहे तर चि. प्रसनजित शिंदे, ॲड.पुजा देडे, बद्रीनाथ खंडागळे,भिमराव घोडेराव आदी कलावंतानी काम केले आहे. तसेच तांत्रिक बाजू सुभाष कांबळे, सौरभ धापसे व निकेश भांगे यांनी सांभाळली आहे.

## सुनीता भिलेगावकर यांचे निधन



माजलगाव येथील मंगलनाथ कॉलनीतील रहिवासी असलेल्या सुनिता रंगराव भिलेगावकर यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी पहाटे निधन झाले. प्रकृती अस्वस्थमुळे त्यांच्यावर रुणालयात उपचार सुरू होते उपचारादरम्यान प्राणज्योत मालवली त्यांच्या पश्चात पती रंगराव भिलेगावकर मुलगा इंदिरेस भिलेगावकर दोन मुली नातवंडे असा परिवार आहे

## पिंपळनेर पोलिसांची अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई



**बीड । प्रतिनिधी**

पिंपळनेर पोलिसांनीअवैध वाळू वाहतूक करणाऱ्या एका लॉरीवर वडगाव, येथे कारवाई केली सपोनि श्री घुगे यांना कुक्कडगाव ते पिंपळनेर रोडने अवैध वाळू भरलेली लॉरी येत असल्याची माहिती मिळाली होती. माहितीनुसार, पोलीस उपनिरीक्षक गोलवाल आणि पोलीस अंमलदार दीपक दशरथ धोंडे (फिर्यादी) यांच्या पथकाने वडगाव येथे नाकाबंदी केली आणि विनानंबरची TATA 912 कंपनीची चारचाकी लॉरी थांबवली. आरोपी अमर नामदेव टपळे (वय २९ वर्षे, रा. गुंधा (वडगाव), ता. जि. बीड) हा लॉरी चालवताना आणि वाळूसह मिळून आला. आरोपीने सिंदफना नदी पात्रातून मजुरांच्या सहाय्याने वाळू अवैध उत्खनन करून ती विनापरवाना व शासनाचा कर चुकवून चोरटी वाहतूक करत असल्याचे चौकशीत स्पष्ट झाले. पोलिसांनी एक चॉकलेटी व पिवळया रंगाची विनानंबरची TATA ९१२ लॉरी (अंदाजित किंमत रु. १०,००,०००/-) आणि अंदाजे दोन ब्रास वाळू (किंमत रु. १०,०००/-) असा एकूण रु. १०,१०,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीविरुद्ध विविध कलम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत सो, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर सो, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार सो यांच्या मार्गदर्शन मध्ये सपोनि श्री. मधुसुदन घुगे, पोउपनि श्री. अर्जुन गोलवाल, पोलीस अंमलदार धोंडे, खांडेकर यांच्या पथकणे केली आहे.

## मा.आ.लक्ष्मण आण्णांनी नाट्यगृहाला दिले पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे नाव

### निवडणुकीत भाजपला फायदा होऊ नये म्हणून यांनीच वर्षभर नाट्यगृह सुरू होऊ दिले नाही : माजी नगरसेवक कृष्णा काकडे यांचा आरोप

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरात माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून तब्बल ७ कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेले भव्य नाट्यगृह काम पूर्ण करून त्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात आले. मात्र गेल्या वर्षभरापासून हे नाट्यगृह सुरू न करण्यामागे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांचा राजकीय हस्तक्षेप असल्याचा गंभीर आरोप माजी नगरसेवक कृष्णा काकडे यांनी प्रसिद्धी पत्रकातून केला आहे.

पुढे काकडे म्हणाले की, लक्ष्मण आण्णांनी अडथळ्यांचा सामना करत हे नाट्यगृह पूर्ण केले आणि सभागृहाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव दिले. हे नाव दिल्याने व हे काम पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीत याचा फायदा भाजपला होईल, या भीतीने राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मुद्दामच अडथळे निर्माण केले. काकडे यांनी पुढे म्हटले की, नगरपरिषदेत प्रशासक असताना संबंधित राष्ट्रवादी नेत्यांनी नाट्यगृह सुरू होऊ नये यासाठी जाणूनबुजून खोडा घातला. केवळ लाईट कनेक्शन न बसल्यामुळे हे नाट्यगृह सुरू होऊ शकले नाही. या संदर्भात मी स्वतः दि.९ एप्रिल २०२५ रोजी लेखी निवेदन देऊन अनेक वेळा पाठपुरावा करत तात्काळ मीटर बसवून नाट्यगृह सुरू करण्याची मागणी केली होती. मात्र निवडणूक जवळ आल्याने हे सभागृह सुरू झाले तर त्याचा राजकीय फटका बसेल, या भीतीने प्रशासकावर दबाव टाकत नाट्यगृह अडविण्याचे काम राष्ट्रवादीच्या नेत्यांनी केले, असा स्पष्ट आरोप त्यांनी केला.तर लक्ष्मण आण्णांच्या माध्यमातून झालेल्या या नाट्यगृहामुळे येणाऱ्या काळात गेवराईतील सांस्कृतिक आणि कलाक्षेत्रासाठी मोठा फायदा शहरवासीयांना होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर यांनी कितीही अडवणूक करत रडीचा डाव खेळला तरी गेवराई शहरातील जनता ही पवार कुटुंबियांच्याच पाठीशी असून येत्या २ तारखेला भाजपच्या सौ.गीताभाभी पवार यांच्यासह सर्वच्या सर्व उमेदवार प्रचंड बहुमताने विजयी होतील असे त्यांनी सांगितले.

## ग्रामीण भागातील युवकांनी आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेला सामोरे जावे !: प्रा.सुरज छनवाल

### जयभवानी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर व्याख्यान

**पाटोदा । प्रतिनिधी**

ग्रामिण भागातील युवकांनी आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेला सामोरे जावे! यश मिळतेच.असे प्रतिपादन अहिल्यानगर येथिल प्रहार कॅडमीचे संचालक प्रा.सुरज छनवाल यांनी केले.ते जयभवानी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या विविध प्रकारच्या संधी व त्यासाठी लागणारी शैक्षणिक पात्रता आणि अभ्यासाची दिशा यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले.हा कार्यक्रम प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांच्या अध्ययक्षतेखाली व प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला,व्यासपीठावर समाजशास्त्र



विभाग प्रमुख व महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. सुनील जाधव सर, माजी प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे सर व प्रा.सतिश जरांगे सर हे देखील उपस्थित होते. या प्रसंगी प्रा. डॉ.सुनिल जाधव यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षे विषयी पूर्वज्ञान मिळावे म्हणुन महिविद्यालयात अशा व्याख्यानाचे आयोजन संबधीत विभागाच्याहवत्तीने केले जाते.यामधुन विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी!असे त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना अहवान केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व प्रास्ताविक या विभागाच्या समन्वयक विद्यापीठ अधिसभा सदस्या श्रीमती प्रा.डॉ. कल्पना हनुमंतराव घारगे यांनी केले. तर आभार राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. बंडू लोखंडे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक प्रा. डॉ.सुनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.सिद्धीकी सर, उपस्थित होते.

**जाहीर प्रगटन**

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १७६२ / २०२५

CNR No. MHBI02000038472025

शांताबाई सुग्रीव रसाळ व ईतर ४ वि. निरंक

अर्जदार :१. शांताबाई भ्र. सुग्रीव रसाळ, वय-४७ वर्षे, धंदा-घरकाम व शेती, रा. मांजरसुंबा ता. जि. बीड, २. सुरज पि सुग्रीव रसाळ, वय-२० वर्षे, धंदा-शिक्षण व व्यापार, रा. वरील प्रमाणे, ३. श्वेताली पि. सुग्रीव रसाळ, वय-२५ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. वरील प्रमाणे, ४. स्वप्नाली पि. सुग्रीव रसाळ, वय-३० वर्षे, धंदा-शिक्षण, रा. वरील प्रमाणे ५. लक्ष्मीबाई भ्र. यशवंतराव रसाळ, वय ७५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. वरील प्रमाणे रा. बीड मामला, मोमीनपुरा, बीड ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ ते ५ यांनी या न्यायालयात सुग्रीव यशवंतराव रसाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत सुग्रीव यशवंतराव रसाळ यांचा मृत्यु दिनांक २८/१०/२०२५ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे व अर्जदार क. ३ व ४ या मयताच्या मुली आहेत. आणि अर्जदार क. ५ ही मयताची आई आहे. तसेच मयताची वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयंत सुग्रीव यशवंतराव रसाळ यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी. प्रकरणातील पुढील तारीख ०३/०१/२०२६

आज दिनांक २६ माहे नोव्हेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. (मार्फत ॲड. एम. के. पोकळे)

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर बीड







दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. २९ नोव्हेंबर २०२५ ● पान ४


## बीडच्या प्रभाग २१ ब मधील मतदारांची बाळासाहेब गुंजाळ यांना खंबीर साथ

### मतदारांचा ठाम निर्धार ; विकास थांबू देणार नाही ; घडीवरची साथ कायम !

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर पालिका निवडणूक अंतिम टप्प्यात असताना प्रभाग २१ ब मध्ये एकच नाव सर्वांच्या ओठांवर आहे ते म्हणजे बाळासाहेब गुंजाळ. गेल्या काही वर्षांत प्रभागात केलेल्या विकासकामांची साक्ष स्वतः नागरिकच देत आहेत. म्हणूनच



आज सर्व समाजघटकातून काम करणाऱ्यांची साथ सोडायची नाही असा निर्धार केला जात आहे. बीड शहरातील प्रभाग क्र. २१ ब मध्ये बाळासाहेब गुंजाळ यांनी रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सामाजिक उपक्रम राबविले. प्रत्येक ठिकाणी गुंजाळ यांच्या कामाचा ठसा दिसत आहे. प्रभागातील तरुण, महिला, ज्येष्ठ नागरिक, सर्व जाती-धर्मातील कुटुंबे - सर्वांनीच गुंजाळ यांच्यावरचा विश्वास पुन्हा दृढ केला आहे.मतदारांच्या भावना एकाच दिशेने झेपावत आहेत. विरोधक कितीही आले तरी कामापुढे शब्द चालत नाहीत घडीवर विश्वास आहे ही भावना प्रत्येक मतदारांच्या मनात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि शिवसंग्राम या मित्रपक्षांची मजबूत साथ गुंजाळ यांना मिळत आहे. जनसमर्थनाची ही लाट आता अधिक जोमाने पुढे सरकते आहे. बाळासाहेब गुंजाळ यांना विजयी करण्याचा निर्धार नागरिकांनी स्पष्ट केला आहे. प्रत्येक गल्लीत, प्रत्येक घरामध्ये आता एकच नारा दिला जात असून गुंजाळ यांना निवडून आणण्याचा मनोदय मतदार बोलून दाखवत आहे.

## श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ ना. अजितदादा पवार यांची बीडमध्ये उद्या जाहिर सभा

### बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शिवसेना-शिवसंग्राम-सपा व मित्रपक्ष आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलताताई पारवे यांच्यासह सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या जाहिर सभेचे आयोजन बीड येथे करण्यात आले असून यावेळी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शिवसेना-शिवसंग्राम-सपा व मित्रपक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलताताई पारवे यांच्यासह सर्व उमेदवारांनी आघाडी घेतली असून त्यांच्या प्रचारार्थ बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार दुसऱ्यांदा बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात ना. अजितदादा पवार यांनी आपल्या जाहिर सभेत विकासाचे व्हिजन मांडल्यामुळे बीड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि मित्रपक्षाच्या कार्यकर्त्यांसह मतदारांमध्ये उत्साह भरला होता. प्रचाराच्या ▶ उर्वरित पान २ वर

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची बाजीराव चव्हाण यांच्या कार्यालयाला सदिच्छा भेट

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम ताई गोऱ्हे यांनी युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या बीड येथील जनसंपर्क कार्यालयाला आज सदिच्छा भेट दिली. या भेटीमुळे स्थानिक शिवसैनिकांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

डॉ. गोऱ्हे यांच्या आगमनानंतर बाजीराव चव्हाण यांनी त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले आणि आदरातिथ्य करत त्यांच्याकडून



आशीर्वाद घेतले. कार्यालयात सुरू असलेल्या जनसेवा, युवकांसाठी राबवलेल्या उपक्रमांची माहिती त्यांनी उपसभापतींसमोर मांडली. डॉ. गोऱ्हे यांनी बाजीराव चव्हाण यांच्या कार्याचे कौतुक करत ग्रामीण भागातील समस्यांवर सातत्याने काम करून युवकांना दिशा देण्याचे काम स्तुत्य आहे असे मत व्यक्त केले. भेटीदरम्यान डॉ. गोऱ्हे यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत महिला सक्षमीकरण, युवकांचा राजकारणातील सहभाग, सामाजिक न्याय आणि शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढवण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांवर थोडक्यात मार्गदर्शन केले. स्थानिक प्रश्न, ▶ उर्वरित पान २ वर

## परळीत रोजगार निर्मिती आणि विकास हाच माझा अजेंडा: धनंजय मुंडे

### परळी शहरातील आझाद नगर भागात धनंजय मुंडेंच्या कॉर्नर बैठकीस सभेचे स्वरूप ; आझाद नगर भागातील जनतेने मला जे प्रेम दिले, तसेच प्रेम नगराध्यक्ष व सदस्य पदांच्या उमेदवारांना देण्याचे आवाहन

**परळी वै. । प्रतिनिधी**

औष्णिक विद्युत केंद्रात मेगा सोलर प्रकल्प उभारणे, सिमेंट फॅक्टरी, शासकीय शिक्षण संस्था, वैद्यनाथ मंदिर पर्यटन अशा विविध माध्यमातून रोजगार निर्मिती करणे आणि शहराचा विकास करणे, हा आमचा अजेंडा आहे. जाती - धर्माचे राजकारण करणे मला कधीच जमले नाही,



म्हणूनच परळीची जनता माझ्या पाठीशी आजवर खंबीर पणाने उभी राहिली आहे. आज नगर परिषद निवडणुकीत देखील मी विकासाचा अजेंडा घेऊन मत मागत आहे. पुन्हा इथली जनता कुणाच्याही बुद्धिभेदाला बळी न पडता विकासाच्या मागे उभी राहील, इथल्या मातीची आणि माणसांची सर्वत्र बदनामी करणाऱ्यांना मतातून उत्तर देईल, असा विश्वास माजी मंत्री आ. ▶ उर्वरित पान २ वर

## प्रभाग पाच मधील भाजपा उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा: बाबा वाघमारे



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई - नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाचे लोकनेते बाळराजे पवार यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या निवडणूकीत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार आदरणीय गिताभाभी पवार यांच्यासह प्रभाग क्रमांक ५ मधील सौ.रेवती घुबार्डे व सौ. कविता एकनाथ लाड यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन युवानेते बाबा वाघमारे यांनी दिलेल्या ▶ उर्वरित पान २ वर

## गेवराई शहर नावारुपाला आणण्यासाठी राष्ट्रवादीचे उमेदवारांना विजयी करा

### प्रभाग क्र. १० मध्ये रणवीर पंडित यांच्या प्रचार फेरीला उत्स्फुर्त प्रतिसाद

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहराच्या प्रत्येक भागाच्या विकासाचा आराखडा माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी तयार केला. या विकास आराखड्यातील नियमानुसार विकास कामे केली तर गेवराईचा सर्वांगिन विकास होईल. महामार्गावरचे हे शहर नावारुपाला येईल, त्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांच्या पाठिशी शहरवासियांनी आपली ताकद उभी केली पाहिजे. त्यासाठी मनामध्ये कुठलीही शंका न येता तरुण कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस



पक्षाच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्यासाठी परिश्रम घेण्याचे आवाहन करून मतदारांनी आपले मतदानरुपी आशिर्वाद देऊन नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई दाभाडे यांच्यासह सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन राष्ट्रवादीचे युवा नेते रणवीर पंडित यांनी केले. गेवराई नगर परिषद निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई दाभाडे तसेच प्रभाग क्र. १० मधील उमेदवार सौ. रेणुका शिवलिंब सांभाहारे व शेख खाजा कटूमियाँ यांच्या प्रचारार्थ संतोषनगर, मोंढा नाका, कोरबू गल्ली, कल्पेश्वर मळा आदी भागात प्रचार फेरी काढून रणवीर पंडित यांनी घरोघरी जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. त्यांच्या या प्रचार फेरीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला, नागरीकांनी त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधून आपल्या समस्यां सांगितल्या. भविष्यात नागरीकांचे मुलभूत प्रश्न ▶ उर्वरित पान २ वर

## नगराध्यक्ष पदाचे आरक्षण खुल्या प्रवर्गाला सुटले असते तर अमर नाईकवाडे आमचे उमेदवार होते : आ. विजयसिंह पंडित

### तुमच्या प्रश्नांची जाण असणाऱ्या जनसेवकाला जपण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

तुमच्या प्रश्नांची जाण असणाऱ्या आणि त्यांच्या नेतृत्वाची उंची समजून घेऊन अमर नाईकवाडे या जनसेवकाला जपा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी प्रभाग क्रमांक ३ मधील नागरिकांना केले. नगराध्यक्ष पदाचे आरक्षण खुल्या प्रवर्गासाठी सुटले असते तर अमर नाईकवाडे हेच आमचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार होते असे म्हणत आ. पंडित यांनी अमर नाईकवाडे यांच्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याच्या लोकप्रियतेवर शिक्कामोर्तब केले. बीड नगरपालिका निवडणुकीच्या



अनुषंगाने प्रभाग क्रमांक ३ मधील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार अमर नाईकवाडे आणि श्रीमती सरवदे रेश्मा रामदास यांच्या प्रचारार्थ आयोजित कॉर्नर सभेत आ. विजयसिंह पंडित बोलत होते. यावेळी ▶ उर्वरित पान २ वर

## परळी नगरपरिषद निवडणुक: महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे मैदानात

● परळीकरांचे आमच्यावर प्रचंड प्रेम ; केवळ विकास,विकास आणि विकासाच होणार
– सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे

● विकासाची परंपरा आणि प्रगतीची गती वाढवण्यासाठी प्रामाणिक काम करणार
– सौ पद्मश्री धर्माधिकारी

● महायुतीचा प्रचंड मताधिक्याने नगरपरिषदेवर झेंडा फडकेल सौ. राजश्री वहिनींना विश्वास !

**परळी वै. । प्रतिनिधी**

नगरपरिषद निवडणुकीत आज सकाळपासूनच सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ विविध भागात प्रचार दौरा केला. या प्रचार दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत नागरिकांनी विशेषतः महिलांनी त्यांचे आत्मीय स्वागत करत वहिनी महायुतीच विजय होणार अशी खात्रीच राजश्रीवहिनी यांना दिली.आमच्यावर परळीकर जनतेचे प्रचंड प्रेम असून या प्रेमाला उतराई होण्यासाठी केवळ विकास आणि विकासच करू असा शब्द सौ. राजश्रीताई मुंडे यांनी यावेळी ठिकठिकाणी बोलताना दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व परळी शहरातील विविध प्रभागात महायुतीच्या वतीने अधिकृत उमेदवारी देण्यात आलेल्या सर्व उमेदवारांच्या



प्रचारासाठी सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे या स्वतः मैदानात उतरल्या असून आज पासून त्यांनी आपल्या प्रचार व जनसंपर्क दौऱ्याला सुरुवात केली. यामुळे परळीत प्रचंड चैतन्य निर्माण झाले आहे. आज शुक्रवारी सकाळी आठ वाजल्यापासून प्रभाग क्रमांक सहा मधून या दौऱ्याला सुरुवात झाली. यावेळी त्यांच्या समवेत नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ .पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्यासह या प्रभागातील उमेदवार बनसोडे अंजली केशवराव, शिंदे व्यंकटेश बाबुराव यांच्यासह

पदाधिकारी उपस्थित होते. सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांची परळी शहरातील नागरिकांशी घट्ट नाळ जोडलेली असून त्यांचा मोठा जनसंपर्क आहे याची प्रचिती या दौऱ्यातही बघायला मिळाली. या आधीही त्यांनी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत सक्रिय सहभाग घेत प्रचाराचा ▶ उर्वरित पान २ वर

## प्रसिद्धीसाठी बिनबुडाचे आरोप थांबवा

### आ. सुरेश धस यांच्यावर होत असलेल्या खोट्या आरोपांचा जि.प.सदस्य माऊली जरांगे यांच्याकडून निषेध

**पाटोदा। प्रतिनिधी**

राम खाडे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या प्रकरणात आमचे दैवत असलेल्या आमदार सुरेश धस यांचे नाव विनाकारण पुढे केले जात असल्याचा तीव्र निषेध अंमळनेर जि.प. सदस्य माऊली जरांगे यांनी व्यक्त केला आहे. जरांगे म्हणाले की,केवळ प्रसिद्धीसाठी कोणत्याही व्यक्तीने खोटे,आधारहीन आणि पातळीहीन आरोप करून आमचे लोकनेते आ. सुरेश धस यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला, तर तो आम्ही कधीच सहन करणार नाही.या प्रकरणाशी आमदार धस यांचा काहीच संबंध नसताना, हेतुपुरस्सर त्यांचे नाव सोशल मीडियावर पुढे केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. हा प्रकार अत्यंत संतापजनक आणि राजकीय हेतुपुरस्सर रंग देण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जरांगे पुढे म्हणाले की,राम खाडे यांच्यावर झाला तो हल्ला अत्यंत ▶ उर्वरित पान २ वर